पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिति

कार्यपत्रिका क्रमांक १३

**सभावृत्तांत**

दिनांक - ०६/१२/२०१३ वेळ – सकाळी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०६/१२/२०१३ रोजी सकाळी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. मोटे किरण बाळासाहेब
२) मा. काळभोर वैशाली जालिंदर
३) मा. जाधव साधना रामदास
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. काळजे नितीन प्रताप
७) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव

याशिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.दुधेकर, मा.साळवी – कार्यकारी अभियंता, डॉ.गुजर – वैद्यकीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक – मा. वैशाली काळभोर

सभा भरविणेकामी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नसलेने प्रशांत शितोळे यांची सभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-------------

( मा. प्रशांत शितोळे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**----------**

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१२) मा.सौ.मनिषा काळूराम पवार, नगरसेविका यांचा मा.महापालिका सभेस अनुपस्थित राहणेस परवानगी मिळणेबाबतचा विनंती अर्ज - मा.प्रशांत शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३) सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील वाहतूक सुधारणा विषयक कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.१४) ब प्रभागातील चिंचवड परिसरात वॉर्ड सेंटर बांधणे व १० कलमी कार्यक्रमासाठी आवश्यक कामे करणे.

विषय क्र.१५) पर्यटन विकास आराखडयांतर्गत मोरया गणपती मंदीर परिसर, चापेकर स्मारक कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.१६) प्रभाग क्र.१७ से.क्र.२६ मध्ये नाटयगृह बांधणे.

विषय क्र.१७) पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्त्यावर सी.डी.वर्क्स बांधणे.

विषय क्र.१८) पिंपरी चिंचवड शहराचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करुन त्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करणे.

विषय क्र.१९) पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्ता विकसित करणे.

----------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.शैलजा शितोळे | अनुमोदक – मा. किरण मोटे

सोमवार दिनांक ०९/१२/२०१३ दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभाध्यक्ष -** सोमवार दिनांक ०९/१२/२०१३ दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( प्रशांत शितोळे )
**सभाध्यक्ष**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक १३

**<u>सभावृत्तांत</u>**

( दिनांक ०६/१२/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - ०९/१२/२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक ०६/१२/२०१३ ची तहकूब सभा सोमवार दिनांक ०९/१२/२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जवळकर वैशाली राहूल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. काळजे नितीन प्रताप
८) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव

याशिवाय मा.टेकाळे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.दुधेकर, मा.साळवी, मा.जुंधारे – कार्यकारी अभियंता, डॉ.गुजर – वैद्यकीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने ऐनवेळचा विषय दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२०) सभा आयोजनाबाबत ... मा.वैशाली काळभोर, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०१/११/२०१३ व १२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.११)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १५४ विषय क्रमांक : १

दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४१/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. सतिश कुलकर्णी, मुख्य अधिकारी गट अ यांचे सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत ....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १५५ विषय क्रमांक : २

दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४२/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. ज्ञानेश्वर ढेरे, मुख्याधिकारी श्रेणी-१ यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक : १५६ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.किरण मोटे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०४७/२०१३, दि.०३/०८/२०१३

विषय - श्री. गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत ...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक : १५७ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/८११/२०१३, दि.२१/०६/२०१३

विषय - श्री. प्रमोद भीमराव भोसले, उपसंचालक, वित्त व लेखा सेवा (वरिष्ठ) गट-अ यांचे मुख्यलेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने केलेल्या नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबत..

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १५८ विषय क्रमांक : ५
दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५०/२०१३, दि.१३/०९/२०१३

विषय - जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.....

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १५९ विषय क्रमांक : ६
दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५७/२०१३, दि.१७/०९/२०१३

विषय - श्री. प्रशांत शरद खांडकेकर, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत ....

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६० विषय क्रमांक : ७
दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२८/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ बाबत.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६१ विषय क्रमांक : ८
दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.नितीन काळजे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२९/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नविन पदांच्या पद निर्मितीबाबत...

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६२ विषय क्रमांक : ९

दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१३८६/२०१३, दि.१८/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व उप अभियंता (स्थापत्य) पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इत्यादी सेवाविषयक तपशील पडताळून तसेच श्री.संजय कांबळे, उपअभियंता यांना आदेश क्र.आ.कक्ष/कावि/१०३/१३, दि.६ एप्रिल २०१३ अन्वये केलेली शास्ती विचारात घेऊन खालीलप्रमाणे नमुद उपअभियंता(स्थापत्य) पदावरील अधिका-यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: एक वर्ष कालावधीकरीता पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. कन्हेरे बिमलरॉय रामराव | डी.सी.ई. | खुला |
| २ | श्री. कांबळे संजय दिनकर | डी.सी.ई. | खुला (अनु.जाती) |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६३ विषय क्रमांक : १०

दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१४०६/२०१३, दि.२२/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व उप अभियंता (विद्युत) पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इत्यादी सेवाविषयक तपशील पडताळून तसेच शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.२/१००५/१२,दि.२५/०२/२००५ मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे नमुद उपअभियंता (विद्युत) पदावरील अधिका-यांना कार्यकारी अभियंता (विद्युत) पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: एक वर्ष कालावधी करीता पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. गलबले बाळासाहेब यशवंत | डी.सी.ई. | खुला |
| २ | श्री. घोडे प्रविण आण्णासाहेब | डी.सी.ई. | खुला (इ.मा.व.) |
| ३ | श्री. केदारी पांडूरंग साबा | डी.ई.ई. | अनु.जमाती |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : १६४ विषय क्रमांक : ११

दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : विद्युत विभाग

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.साधना जाधव

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बप्र/वि/ड/कावि/२४९/२०१३, दि.१९/११/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई पुणे रस्त्यावरील दापोडी ते फुगेवाडी सी.एम.ई. रस्ता रुंदीकरणातील रस्ता सुधारणा करणेच्या कामांतर्गत विद्युत विषयक कामासाठी येणा-या र.रु.८६,१८,५००/- (अक्षरी र.रु.शहाऐंशी लाख अठरा हजार पाचशे फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : १६५ विषय क्रमांक : १२

दिनांक : ०९/१२/२०१३

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.साधना जाधव

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

मा.सौ.मनिषा काळूराम पवार, नगरसेविका यांना अपघात होऊन त्यांचे पायावर शस्त्रक्रीया करणेत आलेली असलेने डॉक्टरांनी त्यांना दिनांक १०/११/२०१३ पासून चार महिने पुर्ण विश्रांतीचा सल्ला दिलेला असल्याने त्यांचे दिनांक १६/११/२०१३ चे विनंती अर्जान्वये त्यांना उपरोक्त कालावधीमध्ये मा.महापालिका सभेस अनुपस्थित राहणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६६ विषय क्रमांक : १३

दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : वाहतूक विभाग

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.किरण मोटे

संदर्भ : मा.सह शहर अभियंता (बीआरटीएस) यांचेकडील क्र.वाहतूक कक्ष/३३०/२०१३, दि.३०/११/१३

मा.सह शहर अभियंता (बीआरटीएस) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे वाहतूक विभागाचे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षातील पानांक ३३ वरील अ.क्र.१४ वाहतूक सुधारणा विषयक कामे व पार्कींग जागा विकसित करणे या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावात नमुद यादीतील कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६७ विषय क्रमांक : १४
दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : ब प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.बप्र/स्था/७/कावि/१६५/२०१३, दि.०५/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे ब प्रभागातील चिंचवड परिसरात वॉर्ड सेंटर बांधणे व १० कलमी कार्यक्रमासाठी आवश्यक कामे करणेकामी र.रु.५.०६ कोटीचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६८ विषय क्रमांक : १५
दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : ब प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.बप्र/स्था/५/जा/२५८/२०१३, दि.०५/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पर्यटन विकास आराखडयांतर्गत मोरया गणपती मंदीर परिसर चापेकर स्मारक कामास र.रु.१२,२९,६६,९९२/- (अक्षरी र.रु.बारा कोटी एकोणतीस लाख सहासष्ट हजार नऊशे ब्याण्णव फक्त) इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६९ विषय क्रमांक : १६
दिनांक : ०९/१२/२०१३ विभाग : अ मुख्या.स्थापत्य
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/अमु/६१९/२०१३, दि.०५/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.१७, से.क्र.२६ मध्ये नाटयगृह बांधणेकामी येणा-या र.रु.४१,७३,६२,५००/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस कोटी त्र्याहत्तर लाख बासष्ट हजार पाचशे फक्त) खर्चाचे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक : १७०
विषय क्रमांक : १७
दिनांक : ०९/१२/२०१३
विभाग : क मुख्या.स्थापत्य
सुचक : मा.किरण मोटे
अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/कमु/१४०४/२०१३, दि.०५/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्त्यावर सी.डी.वर्क्स बांधणे, विकसित करणेकामी येणा-या र.रु.३,७५,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) खर्चाचे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक : १७१
विषय क्रमांक : १८
दिनांक : ०९/१२/२०१३
विभाग : क प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.किरण मोटे
अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.कप्र/स्था/१४०५/२०१३, दि.०५/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड शहराचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करुन त्याची टप्प्या टप्प्याने अंमलबजावणी करणे (१) बालनगरी कामास येणा-या र.रु.१८,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.अठरा कोटी पन्नास लाख फक्त) खर्चाचे सुधारीत पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक : १७२
विषय क्रमांक : १९
दिनांक : ०९/१२/२०१३
विभाग : क मुख्या.स्थापत्य
सुचक : मा.किरण मोटे
अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/कमु/१४०७/२०१३, दि.०५/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्ता विकसित करणेकामी येणा-या र.रु.६,००,००,०००/- (अक्षरी र.रु.सहा कोटी फक्त) खर्चाचे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक : १७३ विषय क्रमांक : २०

दिनांक : ०९/१२/२०१३

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

मा.विधी समितीची पुढील सभा दिनांक २०/१२/२०१३ रोजी येत असून त्या दिवशी मा. महानगरपालिका सभा असलेने पुढील सभा सोमवार दिनांक २३/१२/२०१३ दुपारी १२.०० वा.घेणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ११६४ /२०१३
दिनांक - ०९ / १२ / २०१३



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.